आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ सप्टेंबर २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अंमली पदार्थमुक्त भारत घडवण्यासाठी सर्व संबंधित विभागांच्या समन्वयानं राष्ट्रीय पातळीवर मोहीम राबवायची गरज केंद्रीय गृहमंत्र्यांकडून व्यक्त

- नवी दिल्लीत इमारत कोसळून ३ जणांचा मृत्यू, ५ जखमी / ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु

- नेपाळमधल्या पूरबळींची संख्या १ हजार ३४४ वर / सुमारे ५ हजार लोक अद्याप बेपत्ता

**आणि**

- चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टीनं यांनी पटकावलं पुरुष दुहेरीचं विजेतेपद

**<><><><><>**

२०२९पर्यंत अमली पदार्थमुक्त भारत घडवण्यासाठी सर्व संबंधित विभागांच्या समन्वयाने राष्ट्रीय पातळीवर मोहीम राबवायची गरज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज अधोरेखित केली. ते गोव्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

२०१४ ते २०२४ या कालावधीत सुमारे १ लाख ८९ हजार कोटी रुपये किंमतीचे १ कोटी किलोपेक्षा जास्त अमली पदार्थ जप्त करण्यात आले आणि साडे ४८ लाख किलोपेक्षा जास्त अमली पदार्थ नष्ट करण्यात आले, अशी माहिती त्यांनी दिली. पुढच्या ३ वर्षांत अमली पदार्थांची १०० आंतरराष्ट्रीय आणि आंतरराज्य जाळी उद्ध्वस्त करणं, अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या १०० गुन्हेगारांना भारतात परत आणणं आणि अमली पदार्थ तयार करणाऱ्या १०० प्रयोगशाळा उद्ध्वस्त करायचं लक्ष्य सरकारनं ठेवलं आहे, असं शहा यांनी सांगितलं.

अमली पदार्थमुक्त भारतासाठी सुरू केलेली मोहीम ५० कोटी नागरिकांपर्यंत पोहोचेल आणि एक लाख नशामुक्त मित्र तयार करेल, तसंच नशामुक्ती केंद्रांची संख्या १ हजार ७५१पर्यंत वाढेल, असं ते म्हणाले.

<><><><>

नवी दिल्लीच्या सत्य निकेतन भागात आज दुपारी ५ मजली इमारत कोसळून ३ जणांचा मृत्यू झाला, तर ५ जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आत्तापर्यंत ९ जणांना बाहेर काढण्यात आलं आहे. स्थानिक पोलीस, रुग्णावाहिका, इतर आपात्कालीन सेवा आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे जवान सध्या घटनास्थळी मदत आणि बचावकार्य करत आहेत. ढिगाऱ्याखाली नेमके कितीजण अडकलेले आहेत, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे, असं सांगून सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावं, अशा सूचना दिल्लीचे नायब राज्यपाल तरनजीत सिंह संधू यांनी दिले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून कोसळलेल्या इमारतीच्या बाजूची इमारत रिकामी केल्याची माहिती मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपला नियोजित गोवा दौरा रद्द केला आहे. त्यांनी आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्याकडून परिस्थितीचा आढावा घेतला. शहा यांनी या दुर्घटनेतल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला.

<><><><>

बिहार मधल्या विविध भागात पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. गंगा गंडक आणि कोसी या नद्या धोक्याच्या पातळीवरून वहात आहेत. गंगेच्या वाढत्या पाणी पातळीच्या पार्श्वभूमीवर नदी प्रवाहाच्या दिशेने खालील बाजूस असलेल्या भागात विशेष दक्षता घेतली जात आहे. बेगूसराय, लखीसराय, मुंगेर, भागलपुर आणि कठीहार जिल्ह्याच्या गंगा काठच्या संवेदनशील भागावर सातत्यानं लक्ष ठेवण्याचे निर्देश जलसंपदा विभागानं दिले आहेत.

<><><><>

केंद्राकडून होणाऱ्या अपुऱ्या कोळसा पुरवठयामुळे पंजाबमधल्या औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये वीज निर्मिती घटल्याचं माध्यमातील वृत्त कोळसा मंत्रालयानं फेटाळून लावलं आहे. पंजाबसह देशभरात वीज निर्मितीसाठी पुरेसा कोळसा उपलब्ध असल्याचं कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

गणेशोत्सवात डीजेच्या वापराला विरोध करण्यासाठी पुणेकरांनी आज बालगंधर्व रंगमंदिर ते पुणे महानगरपालिका असा मोर्चा काढला. सामान्य नागरिकांसह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यात सहभागी झाले होते. आगामी सणासुदीच्या काळात डीजेचा वापर करू नये, असं आवाहन आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज केलं. छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

युवांनी आरोग्यपूर्ण आणि शिस्तबद्ध आयुष्य जगावं आणि अमली पदार्थांपासून दूर राहून नशामुक्त भारताचं स्वप्न साकार करण्यात योगदान द्यावं, असं आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. गुवाहाटी इथं श्रीमाता संकरदेव आरोग्यविज्ञान विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला ते संबोधित करत होते. युवांनी समाजमाध्यमांच्या आहारी न जाता त्यांचा वापर रचनात्मक गोष्टींसाठी करावा, असंही ते म्हणाले.

<><><><><>

नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा १ हजार ३४४ वर पोहोचला आहे, तर सुमारे ५ हजार लोक अद्याप बेपत्ता आहेत. यामध्ये ५९० परदेशी नागरिकांचा समावेश आहे. बचाव पथकांनी आतापर्यंत १३ हजारापेक्षा जास्त लोकांना वाचवलं आहे.
मृत व्यक्तींची ओळख पटवण्यात अडचणी येत असून, यासाठी डीएनए चाचणीचा वापर केला जात आहे. पूरग्रस्त भागात बचावकार्य, मदत साहित्याचं वितरण, मृतदेहांची हाताळणी आणि रस्ते मोकळे करण्याच्या कामासाठी विविध संस्थांचे सुमारे ८ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. नेपाळ-तिबेट सीमा भागात २६ ऑगस्ट रोजी हिमनदीचा काही भाग कोसळल्यामुळे आलेल्या नैसर्गिक आपत्तीत प्रचंड हानी झाली आहे.

<><><><><>

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं आज पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं. अटीतटीच्या अंतिम सामन्यात त्यांनी चीनच्या जोडीवर ११-२१, २१-१३, २१-१७ असा विजय मिळवला.

पहिला गेम गमावल्यानंतर दुसऱ्या गेममध्ये भारताच्या जोडीनं जोरदार पुनरागमन केलं आणि दुसरा गेम आपल्या नावावर केला. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये एकेका गुणासाठी झगडत शेवटी मिळवलेली आघाडी त्यांनी कायम राखली आणि यात भारताला स्पर्धेतलं

पहिलं विजेतेपद मिळवून दिलं. या जोडीचं या हंगामातलं हे दुसरं विजेतेपद आहे. सिंगापूर ओपन सुपर ७५० स्पर्धेतही त्यांनी अजिंक्यपद पटकावलं होतं, तर थायलंड ओपन सुपर ५०० स्पर्धेत त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

<><><><>

प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत उघडलेल्या सुमारे ५ कोटी ७२ लाख खात्यांमध्ये शून्य शिल्लक असल्याचं आढळून आलं आहे. अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागानं 'माहिती अधिकारा' अंतर्गत दाखल झालेल्या एका अर्जाला दिलेल्या उत्तरात ही माहिती दिली. यंदा १२ ऑगस्टपर्यंत या योजनेतल्या ५९ कोटींपेक्षा जास्त खात्यांमध्ये ३ लाख १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा होती. शून्य शिल्लक असलेल्या सर्वाधिक खात्यांची संख्या उत्तर प्रदेशमध्ये असून त्यानंतर बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि महाराष्ट्र यांचा क्रमांक लागतो. याशिवाय अनेक खाती वापरात नसल्याची माहितीही विभागाने दिली आहे. तसंच, १०० रुपयांपेक्षा कमी शिल्लक असलेली, गेल्या पाच वर्षांत बंद झालेली खाती आणि संशयास्पद व्यवहार किंवा सायबर फसवणुकीमुळे ब्लॉक अथवा गोठवलेली खाती यांविषयीची माहिती केंद्रीय स्तरावर ठेवली जात नसल्याचंही या माहितीत नमूद करण्यात आलं आहे.

<><><><>

शेअर बाजारात पुढल्या आठवड्यात गुंतवणूकदारांचा सावध पवित्रा राहील असा अंदाज असून, स्थूल आर्थिक आकडेवारी, परदेशी संस्थात्मक गुंतवणुकीचा ओघ, ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमती आणि चलन विनिमय दरातले चढ-उतार या घटकांचा गुंतवणुकीवर प्रभाव राहील असा अंदाज आहे. जागतिक गुंतवणूकदार पश्चिम आशियातल्या संघर्षाशी संबंधित भू-राजकीय घडामोडींकडे बारकाईने लक्ष ठेवतील, अमेरिकेतल्या, ग्राहक किंमत निर्देशांक, उत्पादक किंमत निर्देशांक आणि रोजगाराच्या आकडेवारीचा अंदाज घेतील. तसंच बाजारातल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित होत असलेल्या 'ओपेक प्लस' च्या बैठकीकडे लक्ष ठेवलं जाईल. दरम्यान, गुंतवणूकदार पुढल्या आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या तेल बाजारावरच्या मासिक अहवालाची देखील दखल घेतील असा बाजार विश्लेषकांचा अंदाज आहे.

<><><><>

महाराष्ट्रातली, मेळघाट आणि पेंच व्याघ्र प्रकल्प, ही गिधाडांचं यशस्वीपणे पुनर्वसन करणारी देशातली अव्वल वनक्षेत्रं ठरली आहेत. डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान दोन्ही अभयारण्यांमध्ये सोडलेल्या २९ गिधाडांमध्ये जगण्याचा दर ७८ टक्क्यापर्यंत नोंदवला गेल्याची माहिती बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीनं दिली आहे. यामुळे गिधाडांची संख्या वाढवण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांना बळ मिळणार असून, निसर्ग साखळीत महत्वाचा घटक असलेल्या या पक्षाचं भविष्य सुरक्षित होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

//<><><><><>//